# मराठी विश्व : ओपन माईक कॅरिओकी

ता. ३० जानेवारी २०१० रोजी कॅरिओकीचा एक अभिनव कार्यक्रम मराठी विश्वने सादर केला. या अनोख्या मैफिलीत अनेक तानसेन आणि कानसेनांनी हजेरी लावली होती. बहुतेक गायकांची तयारी चांगली होती.

या कार्यक्रमाचं वैशिष्ट म्हणजे या कार्यक्रमाला मराठी विश्वच्या सभासदांव्यतिरीक्त अनेक अमराठी गायक-गायिकांची देखील उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात 'रमणा' यांनी गायलेल्या गणेशस्तवनाने झाली आणि त्यानंतर सुमधूर हिंदी, मराठी गीतांच्या लडी उलगडत गेल्या. गायकांच्या भरगोस प्रतिसादामुळे मध्यंतर कधी झालं कळलंच नाही. श्री. सुहास पै यांच्या विडंबन गीताने विशेष बहार आणली. तर 'भरत परुळेकर' यांच्या 'इना मिना डिका' या सर्व गायकांसकट गायलेल्या गाण्याने धमाल उडवली. द्वंद्वगीतेही चांगलीच रंगली. मधुकर क्षीरसागर यांनी ट्रॅकसोबत बासरीवादन केले. या कार्यक्रमात मराठी विश्वचे माजी अध्यक्ष प्रदीप देवल, सध्याचे उपाध्यक्ष विकास वाघ, वर्षा आणि रवी गाडगीळ, विजय चिंचणकर, विजय देशपांडे, राजू मोहोळकर, अजय देशपांडे, रश्मी कुलकर्णी, वसंत माधवी, राजेश नानावटी, अभीन पारखी आणि कितीतरी अमराठी गायकांनी गीते सादर केली. नितीन आणि शाहिदा अष्टेकर, अशोक देशपांडे, उदय गोगटे, लीना नेत्रावळी, मुग्धा अजगांवकर, रवी भांगले, साधना व प्रदीप जरीवाला, नरेन व नीलम नेरुरकर आणि कितीतरी अमराठी रसिक मंडळी, गाणी 'म्हणायला' नाही तर गाणी फक्त 'ऐकायला' आलेली होती.

मराठी विश्व कार्यकारिणीच्या सदस्या, राजश्री कुळकर्णी यांनी हा कार्यक्रम आयोजित केला होता. राजेश कुलकर्णी हे ध्वनी तंत्रज्ञ होते. कौस्तुभ कुलकर्णी यांचाही मदतीत सहभाग होता. नेहमीप्रमाणे अशोक देशपांडे यांनी भरपूर फोटोज् काढून मराठी विश्वच्या सुंदर आठवणीत भर घातली.

कार्यक्रमाविषयी प्रतिक्रीया गोळा करत असताना हेच ऐकू येत होतं की या कार्यक्रमाची पुनरावृत्ती व्हावी.
हीच मराठी विश्व कडून अपेक्षा केली जात होती.



**-वर्षा गाडगीळ**
















:- मराठी विश्व (साहित्य विश्व : फेब्रुवारी-मार्च २०१०) च्या सौजन्याने